हिंदुस्थान
www.dainikhindusthan.com

| सराफा बाजार | मुद्रा बाजार | शेअर बाजार |
| --- | --- | --- |
| सोने १० ग्रॅम ३३,५००.०० चांदी किलो ३९,५००.०० | अमेरिकन डॉलर ७१.०२ रुपये | बीएसई ३५.८०८.९५ निफ्टी १०,७२४.४० |

# पुलवामा येथील भ्याड अतिरेकी हल्ल्याविरोधात अमरावतीत जनआक्रोश

## अतिरेक्यांचा पुतळा व पाकिस्तानचा झेंडा जाळून निषेध






अमरावती दि.१५ : जम्मू काश्मिर मधील पुलवामा येथे अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात सीआरपीएफचे ४२ जवान शहिद झाल्याची घटना गुरुवारी घडली. या घटनेचे तिव्र पडसाद अमरावती शहरात उमटले. विवीध राजकीय पक्ष,संघटना तसेच संस्थांच्यावतीने शहरात पाकीस्थान समर्थीत अतिरेक्यांचा पुतळा जाळून तसेच पाकीस्तानचा झेंडा जाळून निषेध व्यक्त करण्यात आला.

जम्मू काश्मिर येथील पुलवामा येथे अतिरेक्यांनी देशाच्या सुरक्षा जवानांच्या ताफ्यावर आत्मघाती हल्ला करून ४२ जवानांचा बळी घेतला. या भ्याड हल्ल्याच्या विरोधात देशभरात तिव्र जनभावना प्रगट होत असतांना,अमरावती शहरात देखिल या घटनेचे तिव्र पडसाद उमटले.शहरातील विवीध राजकीय पक्ष व संघटनांतर्फे राजकमल चौक येथे तिव्र निदर्शने करण्यात आले. यावेळी पाकीस्तान विरोधी घोषणाबाजी करून पाकीस्तानचा राष्ट्रीय ध्वज तसेच अतिरेक्यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळण्यात आला. विश्व हिंदु परिषद, बजरंग दल, युवासेना, भीम आर्मी, हिंदु जनजागृती समितीच्यावतीने करण्यात आलेल्या या आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते.

विश्व हिंदुपरिषद बजरंग दलाच्यावतीने करण्यात आलेल्या आंदोलनात विश्व हिंदु परिषदेचे जिल्हाध्यक्ष अनिल साहु, जिल्हा मंत्री,शरद अग्रवाल, महानगर मंत्री,बंटी पारवानी, विभाग संघटनमंत्री सागर खेडकर, दिवेश सिंह, जिल्हा संयोजक विपिन गुप्ता, सुमीत साहू, आकाश पाली, दुर्गेश ठाकूर, दिपक महाराज पाठक, सुरज साहु, धर्मेंद्र गुप्ता, उमेश मोतके,अनिल शर्मा, अनिकेत साहु, पवन श्रीवास, आकाश बेलसरे, विजय खडसे, शुभम भुजाडे, (उर्वरित पान २ वर)

# प्रकल्पग्रस्तांचे प्राक्तन!

रडार
• शैलेश धुंदी •

प्रकल्पांची निर्मिती करतांना अनेकांची शेती, घर व गाव हिरावले जात असते. विकासाच्या नावावर माणसांची घर,जमीनशीची असलेली नाळच तोडून टाकली जाते. तसे करीत असतांना विस्थापितांचे पूर्णपणे पुर्नवसन होत नसल्याचा आजवरचा अनुभव आहे. अमरावती विभागातील प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा, यासाठी सलग चार दिवस हजारो प्रकल्पग्रस्तांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राहुटी आंदोलन केले. सुरुवातीपासून चर्चा नको, निर्णय हवा अशी थेट भूमिका घेणारे आंदोलक शेवटी मात्र नरमले. प्रकल्पग्रस्तांच्या जमिनींची नव्याने खरेदी व्हावी, नोकरी मिळावी यासारख्या मागण्या धोरणात्मक आहेत. त्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत निकाली निघू शकतात, त्यामुळे सरकारला अवधी दिल्याचे प्रकल्पग्रस्तांचे म्हणणे होते. सोमवार ते गुरुवार अशा सलग चार दिवस व रात्री आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठाण मांडून प्रशासनाला कोंडीत पकडले होते. प्रशासकीय पातळीवरील चर्चांना देखील ते जुमानत



नव्हते. परंतु आंदोलनाची मर्यादा, कायद्याची अडचण व निर्णयासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता आंदोलक दोन पाऊल मागे आलेत. यापूर्वी देखील त्यांनी अशाप्रकारे माघार घेतली होती. सरकारला वेळ दिला परंतु मागण्या सुटल्या नाहीत. यानंतरही त्या सुटतील की नाही, सांगता येत नाही. प्रकल्पग्रस्तांचे प्राक्तन व्यथेचे असल्याने त्यांना न्याय मिळण्याची आशा देखील दर्शविता येत नाही. अमरावतीच नव्हे तर विभागातील प्रकल्पग्रस्तांच्या व्यथांसाठी उभारलेला लढा तूर्तास शांत झाला. मात्र शासन दफ्तरी शेतकरी व प्रकल्पग्रस्तांची अडवणूक होत असणारच ही बाब स्पष्ट झाली. सरकार कुणाचेही असले तरी प्रकल्पग्रस्तांचे कुणीच नाही, हे देखील यानिमित्ताने अधोरेखित झाले.

विदर्भ बळीराजा संघर्ष कृती समितीच्या नेतृत्वात सोमवारपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रकल्पग्रस्तांनी राहुटी आंदोलन सुरु केले. गेल्या वर्षभरापासून या आंदोलनाची धार वाढत आहे. मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वात हजारो महिला, पुरुष, वयोवृद्ध प्रकल्पग्रस्त संघर्षात सहभागी झाले आहे. प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांची जाण असणाऱ्या चव्हाण व संघर्ष समितीच्या नेतृत्वात हा लढा सुरु झाला. विविध प्रकारचे आंदोलने, निवेदने देण्यात येवून देखील प्रश्न निकाली निघत नसल्याची शक्यता धुसर झाली. यामुळे अमरावती जिल्हाच नव्हे तर विभागातील प्रकल्पग्रस्त यात सोमवारपासून सहभागी झाले. राहुटी आंदोलनाने वाहतुकीला खिळ बसला. नवे जिल्हाधिकारी शैलेश नवाल यांना आंदोलनाची सलामी मिळाली. अमरावती हा आंदोलनाचा जिल्हा असल्याची जाणीव नव्या जिल्हाधिकाऱ्यांना यानिमित्ताने झाली. सलग चार दिवस राहुटी टाकलेल्या प्रकल्पग्रस्तांनी शासनाने कॅबीनेटच्या बैठकीचे निमंत्रण दिल्याने नरमाई दर्शविली. गुरुवारपासून आंदोलनाची तीव्रता वाढण्याची घोषणा करण्यात आली होती. परंतु शासनाने दोन पाऊले पुढे टाकल्याने (उर्वरित पान २ वर)

# युवकाची चाकूने भोसकून हत्या

## जवाहरगेट परिसरातील घटना : पाच आरोपींना अटक : पोलीस ठाण्यावर धडकला जमाव

अमरावती,दि.१६(प्रतिनिधी): जुने वैमनस्य व वर्चस्वातून महाजनपुरा परिसरात राहणाऱ्या युवकाची गुरुवारी मध्यरात्री खून करण्यात आला. योगेश उर्फ गुड्डू वासुदेव हरणे (२४) असे मृतकाचे नाव आहे. गुरुवारी मध्यरात्री साडे अकरा वाजताचे सुमारास ही घटना घडली. पोलीसांनी पाच आरोपींना अटक केली आहे. दरम्यान, आज शुक्रवारी मृतकाच्या नातेवाईकांनी खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात धडक दिली. त्यांनी हत्येविरोधात संताप व्यक्त केला.

मनोज सुभाषराव तायडे (२०), आकाश दिलीप लोखंडे (२२), संकेत महेंद्र खडसे (२१), कृष्णा दिलीप लोखंडे व वैभव उर्फ बंडू सुभाष तायडे (सर्व रा. माताखिडकी परिसर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. यासंदर्भात, गुरुवारी रात्री साडे अकरा वाजताचे सुमारास मृतक योगेश उर्फ गुड्डू वासुदेव हरणे हा त्याच्या मित्रासोबत दुचाकीने इतवारा येथून महाजनपुरा येथे घरी जात होता. जवाहरगेट परिसरातील एका बोळीमध्ये आरोपींनी त्यास अडवून त्याच्या माडीवर चाकूने वार केला. या हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. रक्तबंबाळ योगेश हा मदतीसाठी नागरिकांना आवाज देत होता. यावेळी तो काही अंतर चालत गेला. त्याने त्याच्या काही मित्रांना फोन लावला. त्याचे मित्र त्याला घेवून थेट पोलीस ठाण्यात पोहोचले. परंतु बराच रक्तस्त्राव झाला. त्यानंतर त्याला जिल्हा (पान २ वर)

# अमरावती जबलपुर रेल्वे रद्द झाल्याने प्रवासी संतप्त

अमरावती दि.१५ : रेल्वे लाईनच्या रुळांचे काम सुरू असल्याच्या कारणांवरून अमरावती जबलपूर रेल्वे रद्द करण्यात आल्याने अमरावती रेल्वे स्थानकावर प्रवाशांनी आपला संताप व्यक्त केला. यावेळी संतप्त प्रवाशांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना घेराव घातल्याने रेल्वेस्थानकावर गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती.



रेल्वे लाईनच्या कामासाठी रेल्वे विभागाने अमरावती ते जबलपूर ही रेल्वे काही दिवसासाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. १५ फेब्रुवारी रोजी अमरावती रेल्वेस्थानावर पोहचलेल्या अमरावती जबलपूर रेल्वेच्या प्रवाशांना ही रेल्वे गाडी बंद करण्यात आल्याची माहीती मिळताच प्रवाशांनी रेल्वेस्थानकावर आपला संताप व्यक्त केला.यावेळी (पान २ वर)

# अतिरेक्यांचे अड्डे उध्वस्त करून फुटीरवाद्यांचे संरक्षण काढा

## हिंदु जनजागृती समितीच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



अमरावती दि.१५ : जम्मू काश्मिर येथील पुलवामा येथे अतिरेक्यांनी सुरक्षा दलावर केलेल्या आत्मघातील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर हिंदु जनजागृती समितीच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून काश्मिर मधील फुटीरतावादी नेत्यांचे संरक्षण काढून टाकण्याची मागणी केली.

जम्मू काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यात जैश ए मोहम्मद या आतंकवादी संघटनेने केंद्रिय राखीव पोलीस दलाच्या जवानांवर १४ फेब्रुवारीला भ्याड हल्ला करून ४२ जवानांचे बळी घेतले. पाकसमर्थित आतकवाद्यांनी यापुर्वीसुध्दा उरी येथील भारतीय जवानांच्या तळावर हल्ला केला होता.त्यानंतर भारतसरकाने सर्जिकल स्ट्राईक करून पाकव्याप्त काश्मिरातील आतंकवाद्यांचे अड्डे उध्वस्त केले होते. यानंतरसुध्दा पाकसमर्थीत आतंकवाद्यांच्या भारतातील दहशतवादी कारवाया थांबल्या नाहीत. आतंकवाद्यांच्या अशा भ्याड हल्ल्यांमुळे भारतीय सैनिक शहिद होत आहे. अशा प्रकारचे हल्ले म्हणजे पाकीस्तानच्या अघोषीत युध्दाचाच एक भाग आहे. त्यामुळे भारताच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण झाला आहे. अशा स्थितीत भारत सरकारने आतंकवाद निर्मितीचे केंद्र असलेल्या पाकीस्तानविरोधात कठोर कारवाई (पान २ वर)







# शिष्यवृत्तीचा गोंधळ थांबवा

## महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांचे निवेदन

अमरावती,दि.१५ (प्रतिनिधी): ऑनलाईन शिष्यवृत्ती महाविद्यालयाच्या खात्यात डीबीटी मार्फत जमा होत नाही. या प्रकाराने महाविद्यालयीन कर्मचारी व प्रशासन संभ्रमात आहे. यामुळे हा गोंधळ थांबविण्याची मागणी महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी व समाज कल्याण आयुक्तांना केली आहे.



महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे व समाज कल्याण आयुक्तांना निवेदन दिले आहे. राज्य शासनाने सत्र २०१८-१९ करीता महा डीबीटी प्रणालीद्वारे शिष्यवृत्तीचे अर्ज भरून घेण्याची प्रक्रिया राबविली. या प्रणालीमध्ये सुरुवातीपासूनच (पान २ वर)

